जा.क्र. 6693/2017
धर्मादाय आयुक्त भवन,
३ रा मजला, ८३, डॉ.ॲनी बेझंट रोड,
वरळी, मुंबई ४०० ०१८.
दुरध्वनी क्र.२४९३५४३४ २४९३५४९०
दिनांक :- 28 DEC 2017

# परिपत्रक. ५२६ दि. २८/१२/१७

विषय : न्यायिक अधिका-यांची चार माहि सुधारित विवरणपत्रे नॉर्मस प्रमाणे बिनचूक सादर करणे बाबत.

मा.उच्च न्यायालय, मुंबई यांचे पत्र क्र.A (spl) misc/३८०/२०१७, दि.१८.०८.२०१७ अन्वये न्यायिक अधिका-यांचे चार माहि विवरणपत्र नमून्यात व वेळेत/ बिनचूक सादर करणे बाबत सूचित करण्यात आले आहे.

वरील पत्राचे अनुषंगाने या कार्यालयाचे पत्र क्र.४४३१/२०१७, दि.२२.०८.२०१७ अन्वये न्यायिक अधिका-यांची विवरणपत्रे विहित नमून्यातच बिनचूक त्वरीत दाखल करण्यांबाबत संबंधित सर्व अधिका-यांस कळविणेत आले आहे. तरीही विवरणपत्रे वेळेत सादर न झाल्याने दि.०६.१०.२०१७ रोजी स्पष्टीकरण मागविण्यांत आले.

मा.उच्च न्यायालयास सादर करणे करीता या कार्यालयांत सादर करण्यात आलेली जानेवारी २०१६ ते डिसेंबर २०१६ ची चारमाही विवरणपत्रे तपासली असता सर्वच्या सर्व विवरणपत्रामध्ये प्रामुख्याने खालील चूका निदर्शनास आल्या आहेत.

१. सेक्शन नुसार स्वतंत्र निकाली प्रकरणांच्या स्वतंत्र याद्या नाहीत.
२. सेक्शन ला चूकीचे नॉर्मस् घेण्यांत आले आहेत.
३. उभी आडवी बेरीज जूळत नाही.
४. निकाली प्रकरणांची लिस्ट अपूर्ण.
५. नॉर्मची बेरीज चूकीची घेण्यात आलेली आहे.
६. फॉर्म बी.६ आणि निकाली / लिस्ट यांमध्ये तफावत आहे.
७. फॉर्म बी.६ वर संबंधित धर्मादाय सह आयुक्त यांचा सही शिक्का आवश्यक आहे.
८. Working days मध्ये चूका आढळून येतात.
९. ५ वर्षे, १० वर्षे, १५ वर्षे आणि २० वर्षे निकाली प्रकरणांची लिस्ट स्वतंत्र नाही.
१०.मराठी तसेच कॉमन जजमेंटची लिस्ट स्वतंत्र असणे आवश्यक .
११.Administrator days Norms बिनचूक घेतलेले नसतात.
१२.पदाच्या पुढे In-Charge असल्यास स्पष्टपणे नमूद करणे.
१३.ज्या अधिका-याचे विवारण पत्र (Statement) त्याचे नाव आणि कालावधीसह सुस्पष्ट लिहिणे आवश्यक.
१४.विलंब माफी अर्जाची (Delay) यादी दिलेली नसते.
१५.फक्त By-Judgement चे नॉर्मस् घेणे आवश्यक.
१६.फॉर्म बी - ६ वर विवरणपत्रे तयार करणा-या लिपीकाची, अधिक्षक व अधिकारी यांची नावासहित स्वाक्षरी आवश्यक.
१७. प्रत्येक अधिका-यांचे कालावधीसह वेगवेगळे चारमाही विवरण पत्र सादर करावे.
१८. गैरवादग्रस्त/ वादग्रस्त नोंदणी आदेशाची स्वतंत्र यादी करुन तसे नॉर्मस जमेस धरणे आवश्यक.

त्यामुळे न्यायीक अधिका-यांची मासिक, चारमाही विवरणपत्रे सादर करते वेळी संबंधित न्यायलिपीकांनी

तयार केलेली विवरणे संबंधित अधिक्षक तसेच संबंधित अधिकारी यांनी मा. उच्च न्यायालयाचे सूचनेनुसार आणि नमुन्यानुसार विवरणपत्र असले बाबत विभागातील धर्मादाय सह आयुक्त यांस अधोरेखीत करण्यात यावे.

विवरणपत्र बिनचूक असण्याकरीता आपले विभागातील जिल्हा न्यायालयांतील संबंधितांचे सहकार्य/ मार्गदर्शन घेण्यांत यावे.

मा.उच्च न्यायालयास सादर करावयाची विवरणपत्रे दिलेल्या नमून्यात आणि वर नमूद पूर्ततेसह बिनचूक असले बाबतची खातर जमा संबंधित विभागातील धर्मादाय सह आयुक्त यांनी केल्यानंतर सही शिक्यासह माहितगार कर्मचा-यांमार्फत वेळेत या कार्यालयांत सादर करावीत.

विवरणपत्राचे अनुषंगाने संबंधित अधिका-यांचे पदोन्नती आणि परफॉरमन्स परिगणित होत असते. त्यामुळे सदर प्रकरणी चुका अथवा दिरंगाई झाल्यास त्याचा संबंधित अधिका-याच्या पदोन्नतीवर काही परिणाम होऊ नये याची दक्षता घेण्यात यावी.

मा.उच्च न्यायालयाचे नमून्यानुसार आणि नॉर्मस् प्रमाणे बिनचूक चारमाहि सुधारित विवरणपत्रे मूदतीत सादर न झाल्यास मा. उच्च न्यायालयाकडुन संबंधिताचे परफॉरमन्स आणि पदोन्नतीवर काही परिणाम झाल्यास पुढील कार्यवाहीच्या अनुषंगाने संबंधितास जबाबदार धरण्यात येईल याची नोंद घ्यावी.

धर्मादाय आयुक्त,
महाराष्ट्र राज्य, मुंबई.

प्रत :-

१. सर्व धर्मादाय सह आयुक्त,
२. सर्व धर्मादाय उप आयुक्त,
३. सर्व सहायक धर्मादाय आयुक्त,
४. सर्व अधिक्षक न्याय / जन संपर्क अधिकारी,
५. परिपत्रक नस्ती.